जलस्वराज्य - २ कार्यक्रम.

आष्टी, ता. परतूर, जि. जालना या गावाच्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः जस्वका -२ / ०५१८ / प्र. क्र. १०२/ पापु-११

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,

नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१

दिनांक : १५ मे, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः नाबार्ड-२०१४ / प्र.क्र. ०४/ पापु-०८, दि. १४ /०८/२०१४

२) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांची तांत्रिक मान्यता पत्र क्र. मुअ./मजीप्राऔ/तांशा-१/९७७/२०१७, दि. ३१.५.२०१७

प्रस्तावना :-

जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत राज्यात मुख्य भौतिक गुंतवणूक करण्यात येत आहे. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांचे व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता याबाबत या क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचावणे तसेच शहरालगतच्या, टंचाईग्रस्त व पाणी गुणवत्ताबाधित भागांमध्ये गुणवत्तापूर्ण व शाश्वत पाणी पुरवठा सेवा पुरविणे, हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत मुख्य भौतिक घटकांतर्गत शहरालगतच्या भागातील पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे, गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण पध्दतीने तसेच निर्धारित वेळेत करुन वाढीव दर्जाच्या शाश्वत पाणी पुरवठा व्यवस्थेचे व सांडपाणी व्यवस्थापनेचे प्रयोगनिर्देशन (Demonstration) करणे व एकंदर पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील कामगिरीचा दर्जा उंचावणे अपेक्षित आहे.

२. या कार्यक्रमांतर्गत जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य हे Program for Results - PforR या वित्तिय साधनांतर्गत उपलब्ध होणार असून ते उद्दीष्टपूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी (Disbursement Linked Indicators - DLIs) निगडीत आहे. PforR या तत्त्वावर आधारित असा हा देशातील पथदर्शी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमासाठी जागतिक बँकेकडून ७०% अर्थसहाय्य उपलब्ध होणार असून राज्य शासनाकडून ३० % निधी उपलब्ध होणार आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमातंर्गत मुख्य भौतिक गुंतवणूक घटकांतर्गत समावेश असलेल्या १२ जिल्ह्यांव्यतिरिक्त राज्यातील इतर जिल्हयांपैकी प्रत्येक विभागात एक या प्रमाणे सहा जिल्हयात सांडपाणी व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प “इतर भौतिक गुंतवणूक” या घटकांतर्गत हाती घेण्यास व त्याकरिताचा अंदाजे खर्च रु. ३०.०० कोटी राज्य हिश्यातून करण्यास बाह्य अर्थसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या शक्ती प्रदान समितीने दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. शक्ती प्रदान समितीने उपरोक्त प्रमाणे दिलेली मान्यता विचारात घेऊन औरंगाबाद विभागातून आष्टी, ता. परतूर, जिल्हा जालना येथील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाची निवड करण्यात आली आहे.

३. आष्टी, ता. परतूर, जि. जालना सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाच्या रु. ४१६.९१ लक्ष (ढोबळ) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील पत्रान्वये मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, औरंगाबाद यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. त्यास अनुसरुन आष्टी, ता. परतूर, जि. जालना या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाच्या रु. ४१६.९१ लक्ष (ढोबळ) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

आष्टी, ता. परतूर, जि. जालना या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाच्या रु. ४१६.९१ लक्ष (रु. चार कोटी सोळा लक्ष एक्क्याण्णव हजार) (ढोबळ) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) <u>प्रकल्पाची अंमलबजावणी</u>

i. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावी.

ii. प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यता आदेशात व संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

iii. प्रकल्पाची कामे नियोजनानुसार विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावीत. तसेच प्रकल्पाचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल त्रैमासिक बार चार्ट स्वरुपात शासनास सादर करावा.

iv. प्रकल्पाची अमंलबजावणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार ई-निविदा मागवून करण्यात यावी.

ब) <u>प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला व हस्तांतरण</u>

i. प्रकल्पाची १०० % भौतिक कामे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदार, ग्रामपंचायत व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जालना यांनी संयुक्त पाहणी करावी. त्यानंतर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जालना यांनी प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर प्रकल्प पूर्ण झाला, असे समजण्यात येईल.

ii. भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेला प्रकल्प स्थानिक स्वराज्य संस्थेस (संबंधित ग्रामपंचायत / जिल्हा परिषद) त्वरीत हस्तांतरित करण्यात यावा.

क) <u>प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती</u>

i. प्रकल्पाची भौतिक कामे पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प स्वयंनिर्भर होण्याच्या दृष्टीने प्रकल्पाच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंदाजपत्रकास ग्रामसभेची मान्यता घेवून आवश्यक स्वच्छता कर आकारणे तसेच ५ वर्षांच्या कालावधीसाठी मूळ / ग्रामपंचायतीने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून अथवा ग्रामसभेच्या स्वतंत्र प्रक्रियेद्वारे देखभाल व दुरुस्ती करुन घेण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील.

ii. प्रकल्प चालविणे तसेच प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनामार्फत कोणत्याही प्रकारचे अनुदान देण्यात येणार नाही.

ड) <u>प्रकल्पाचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण</u>

i. प्रकल्पाच्या कामाचे / साहित्याचे गुणवत्तेच्या दृष्टीने तांत्रिक परीक्षण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुणवत्ता परीक्षण पथकाकडून किमान २ वेळा (प्रकल्पाची २० ते ३०% कामे पूर्ण झाल्यानंतर व प्रकल्पाची ६० ते ७०% कामे पूर्ण झाल्यानंतर) करण्यात यावे व याबाबतचा अहवाल सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयास सादर करावा.

इ) <u>निधी वितरण</u>

i. कोणत्याही कारणाने प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्यास वाढीव खर्चापोटी कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

०२. या प्रकल्पावर होणारा खर्च भारतीय रिझर्व बँक, मुंबई येथे उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचे नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी खाते क्र. ६१८४३५००१० मधील उपलब्ध निधीमधून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१५१४३७५५४८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
Date: 2018.05.15 19:16:00 +05'30'

(चं.कृ.मोरे)
शासनाचे अवर सचिव

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. विभागीय आयुक्त, प्रादेशिक विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. टास्क टीम लिडर (जलस्वराज्य-२ कार्यक्रम), जागतिक बँक, १८-२० हिंदूस्थान टाईम्स हाऊस, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१.
९. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
११. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), औरंगाबाद.
१४. जिल्हाधिकारी, जालना.
१५. मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
१७. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, जालना.

१८. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, जालना.

१९. कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जालना.

२०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जालना.

२१. अवर सचिव / कक्ष अधिकारी (कार्यासन पापु-१६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२. निवड नस्ती (कार्यासन पापु-११), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, बेलापूर, नवी मुंबई.

२३. निवड नस्ती (कार्यासन पापु-४, ५, ७, २०), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.